सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:- एचटीआर-०९२१/प्र.क्र४६/२०२३/ छाननी दिनांक-२२ नोव्हेंबर, २०२४

## -: प्रसिध्दीपत्रक :-

विषय:- विविध विषयांतील सहायक प्राध्यापक, महाराष्ट्र कला शिक्षण सेवा,गट-अ (जा.क्र-०६५/२०२३) कागदपत्रांची पुर्तता करण्याबाबत.

संदर्भ:- १. क्रमांक:डीआरए-०५२१/प्र.क्र.१२५/२०२३ जाहिरात दिनांक १३ सप्टेंबर,२०२३

२. शुध्दीपत्रक दिनांक ०३ ऑक्टोबर,२०२४

विविध विषयांतील सहायक प्राध्यापक, महाराष्ट्र कला शिक्षण सेवा, गट-अ या पदाकरीता दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ रोजी आयोगातर्फे जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

२. सदर जाहिरातीमधील शैक्षणिक अर्हता व अनुभव तसेच इतर दाव्यांच्या अनुषंगाने परि. क्र. १३.२ मध्ये नमूद केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. तथापि, प्रस्तुत पदाकरीता अर्ज केलेल्या बऱ्याच उमेदवारांनी कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर केले नाही. यास्तव प्रस्तुत पदासाठी अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करण्याची एक संधी देण्यात येत असुन त्यांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या जाहिरातीमधील परि.क्र.१३.२ मध्ये नमूद केल्यानुसार सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

३. उमेदवारांनी संदर्भाधीन अ.क्र. ०१ वरील जाहिरातीतील तरतुदी विचारात घेवून सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील. तसेच कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर न केल्यास अशा उमेदवारांचा प्रस्तुत निवड प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

४. उपरोक्त विषयांकित पदासाठी केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने (लागू असलेली) कागदपत्रे/प्रमाणपत्रे PDF करून विहित आकारमानामध्ये आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ‘ONLINE FACILITIES’ अंतर्गत ‘Certificates Upload’ या मेनूमध्ये दिनांक ०४ डिसेंबर,२०२४ रोजी २३;५९ वाजेपर्यंत अपलोड करणे अनिवार्य राहिल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण:-नवी मुंबई

अवर सचिव, (सरळसेवा छाननी)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग